CMYK
●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ● अंक १४९ ● शनिवार, दि. ०७ सप्टेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रुपये
●Beed(Maharashtra) ●Year4 ●Issue149 ●Saturday, 07 September 2024 ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●Page1 ●Pages4 ●Price3Rs.




# दैनिक मराठवाडा पत्र


महाराष्ट्राचा बुलंद आवाज

। बीड । परभणी । छत्रपती संभाजीनगर । जालना । लातूर । धाराशिव । हिंगोली । नांदेड । नगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ●https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955




# धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठान मार्फत यंदा १९ व्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन

## अभिनेत्री रश्मीका मंदाना व क्रिती सनॉन गणेश महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास आज परळीत

## कैलाश खेर, अभिलिप्सा पांडा, हेमा मालिनी, अजय-अतुल, आनंद शिंदे यांसह हिंदी-मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांच्या उपस्थितीत परळीवासीयांसाठी दहा दिवसांची सांस्कृतिक मेजवानी







परळी वै. । प्रतिनिधी

**राज्याचे कृषिमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या मार्फत दरवर्षी साजरा केला जाणारा व महाराष्ट्रभर ख्याती असलेला श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सव यावर्षी १९ व्या वर्षात पदार्पण करत असून यावर्षी देखील श्री गणेश महोत्सवाचे परळी शहरात आजपासून दिमाखदार आयोजन करण्यात येत आहे.**

आज श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभमुहूर्तावर श्रींची स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे विधिवत स्थापना करून या गणेश महोत्सवास सुरुवात होईल. या गणेश महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सनोन या दोघींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर ता उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे करणार आहे.

यावर्षीच्या गणेश महोत्सवात प्रतिवर्षी पेक्षाही उत्तम दर्जाच्या कलाकारांच्या उपस्थितीत परळी शहर वासियांना सांस्कृतिक कार्यक्रम ंची मोठी मेजवानी गणेशोत्सवाचे १० ही दिवस अनुभवायला मिळणार आहे.

**असे आहेत कार्यक्रम** – पहिल्या दिवशी सात सप्टेंबर शनिवारी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम तर दुसऱ्या दिवशी ८ तारखेला रविवारी सायंकाळी प्रसिद्ध गायक कैलाश खेर व गायिका अभिलिप्सा पांडा यांच्या शिव भजन गीतांचा कार्यक्रम होईल.

९ सप्टेंबर, सोमवार, अभिनेत्री अमृता खानविलकर, पूजा सावंत, समीरा गुजर, संस्कृती बालगुडे, प्रसंनजीत कोसंबी व अंशिका चोनकर यांचा महाराष्ट्राच्या तारका हा सुप्रसिद्ध संगीतमय कार्यक्रम.

१० सप्टेंबर, मंगळवार : सुप्रसिद्ध बॉलीवूड सिनेतारका, ड्रीमगर्ल, हेमामालिनी यांचा राधा कृष्ण लीला दर्शवणारी शास्त्रीय नृत्याद्वारे विशेष प्रस्तुती.

११ सप्टेंबर, बुधवार : महाराष्ट्राची संस्कृती अंतर्गत या अभिनेत्री मानसी नाईक, माधुरी पवार, मीरा जोशी, हेमलता बने, ऐश्वर्या बदडे यांचा संगीतमय कार्यक्रम.

१२ सप्टेंबर, गुरुवार : इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुप आग्रा यांचा नृत्य थरार व हिंदवी पाटील व प्राजक्ता गायकवाड लावणी यांची जुगलबंदी. १३ सप्टेंबर, शुक्रवार : चला हवा येऊ द्या सहभाग – स्मिता गोंदकर, जुई बेंडकले, हेमांगी कवी, सागर करंडे, भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, .... (उर्वरित पान २ वर)

## ◆ थोडक्यात...

### सहा विधानसभा मतदार संघात २१ लाख ९७ हजार ८30 मतदार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सहा विधानसभा मतदार संघात एकूण २१ लाख ९७ हजार ८३० मतदार आहेत. भारत निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक विचारात घेऊन दि. ०१/०७/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा दुसरा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार पुनरीक्षण पूर्व उपक्रम राबविण्यात आल्यानंतर प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली व प्रारुप मतदार यादीवर दिनांक ०६/०८/२०२४ ते २०/०८/२०२४ या कालावधीमध्ये दावे व हरकती स्वीकारण्यात आले, व दावे व हरकती निकाली काढल्यानंतर दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी जिल्ह्यातील सर्व कार्यालयाच्या ठिकाणी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अंतिम मतदार यादीनुसार बीड जिल्हामध्ये पुरुष मतदार ११.५८,९९८, स्त्री मतदार १०,३८,८०९ व तृतीयपंथी मतदार २३ असे एकूण २१,९७,८३० मतदार आहेत.

# ईडब्लूएस फायद्याचं दाखविण्यासाठी उपमुख्यमंत्री फडणविसांकडून इतर प्रवर्गातून मराठ्यांची अडवणूक

## गेवराईतील घोंगडी बैठकीत मनोज जरांगे पाटलांचा आरोप

गेवराई । प्रतिनिधी

सरकार मराठ्यांच्या मुलांवरती घाव घालत आहे. मराठ्यांच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या तुम्ही थांबवल्या. कुणबी पत्राचा ऑप्शन कोणालाही दिला नाही. तुम्ही मराठ्यांना आजून किती दिवस फसवणार आहात. तुम्ही प्रत्येकवेळी मराठ्यांच्या पोरांना ऍडमिशनमधून बाहेर काढत आहेत. ईडब्लूएस अस्तित्वात असताना फॉर्म भरला मग त्यांना आता त्याचा लाभ



का मिळत नाही? फडणवीस साहेब ईडब्लूएस हेच मराठ्यांच्या फायद्याचं होतं ते तुम्हाला दाखवायचं ... (उर्वरित पान २ वर)

# विधानसभा इच्छुकांना अर्ज करण्यासाठी मुदतवाढ; 10 सप्टेंबर पर्यंत करता येणार अर्ज

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीत उमेदवारीसाठी इच्छुक असणार्यांसाठी दि.५ सप्टेंबर ही अर्ज करण्याची अंतिम तारीख होती. परंतु आता इच्छुकांना अर्ज करण्यासाठी दि.१० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील इच्छुकांनी मुदतीत अर्ज दाखल करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातून विधानसभा निवडणूक-२०२४ साठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्याचे आवाहन बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून करण्यात आले होते. दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी पर्यंत अर्ज करण्याची अंतिम तारीख होती. परंतु पक्षाच्या आदेशानुसार आता अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळालेली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांना ही आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. दरम्यान दि.१० सप्टेंबर २०२४ पर्यंत बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे दररोज सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत इच्छुक उमेदवारांना अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तरी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी मुदतीत अर्ज दाखल करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.




CMYK

## ◆ संपादकीय...

# तुमचा-आमचा सर्वांचा गणेशोत्सव



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचं भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान सर्वांना माहित आहे. जहाल गटांचे नेते अशी लोकमान्यांची ओळख होती. त्यांचा आणि थोर समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचा स्वतंत्र्य की सुधारणा हा वाद देखील सर्वांना माहीत आहे .प्रथम स्वतंत्र्य व मगच सुधारणा असा आग्रह धरणाऱ्या लोकमान्यांनी स्वतंत्र्यासाठी जनजागर व्हावा म्हणून घराघरात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला सार्वजनिक रुप दिले हा निर्णय खरोखरच क्रांतिकारी निर्णय ठरला आहे. गणेशोत्सव म्हणजे ग्रामीण अर्थकारणास गती देणारा उत्सव या अर्थाने आपण याकडे बघितलं पाहिजे या महोत्सवाच्या निमित्ताने एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेला काही काळासाठी गती प्राप्त होते असे म्हणायला हरकत नाही. गणेशाला हिंदू शास्त्रात अग्रपूजेचा मान आहे. आपल्याकडे कला म्हणून ६४ कलांचा परिचय सर्वांना आहे ... आणि गणेशाला सकल कलांचा नायक अर्थात गणनायक म्हणून ओळखले जाते. आपला देश आणि आपली संस्कृती यांचा विचार करताना आपल्या जीवनशैलीशी निगडित असे सण उत्सव आपल्याकडे आहेत आणि त्यांचं महत्त्व देखील अधिक आहे. १२ बलुतेदार परंपरा आज फारशी दिसत नाही मात्र अद्यापही थोड्याफार प्रकारे ग्रामीण भागात व्यवसायांचे स्वरूप कायम आहे. गणेशोत्सवाच्या काळात मूर्ति घडविणारे मूर्तिकार, त्यांना रंगकाम करणारे रंगारी असे खास मनुष्यबळ यांना जसे काम आणि उत्पन्न मिळते तसेच या काळात इतरही बाबतीत व्यवसायिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्त होतो. गणेशोत्सव हा तसा महाराष्ट्राचा उत्सव म्हणून ओळखला जात असला तरी लगतच्या राज्यांमध्ये अगदी राजधानी दिल्लीपर्यंत याचा विस्तार झालेला आपणास दिसतो आता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस आहे त्या सर्व ठिकाणी आता हा गणेशोत्सव साजरा होत असतो. गणेशोत्सव निमित्ताने मंडप, वाद्य, संगीत या क्षेत्रातही मोठी उलाढाल होते. विविध प्रकारचे देखावे तयार करण्याची स्पर्धा या काळात होते यातूनही मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होत असतो. कोकणात गणेश उत्सवाचे खास महत्त्व आहे गणपती आणि गौरीच्या सणासाठी चाकरीसाठी मुंबई गाठलेल्या सर्व चाकरमान्यांनी कोकणात येऊन उत्सव साजरा करायचा यातून कोकणात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पैसा येतो प्रत्येक चाकरमानी आवर्जून यासाठी खर्च करतो. कोकणातील ग्रामीण व्यवस्थेला बळकटी या काळात मिळते. कोकणा बाहेर राज्यातील इतरत्र सर्व ठिकाणी महालक्ष्मीचा तीन दिवसाचा उत्सव याच १० दिवसात असतो. यात रांगोळ्यापासून.... रोषणाईपर्यंत प्रत्येक घरातून खर्च केला जातो मिठाई, पुरणपोळी अशी पदार्थ तसेच विविध प्रकारच्या भाज्यांचे नव्हे तर अगदी पाने आणि फुलं यांचंही या सणात महत्त्व आहे. शेतकऱ्यांना देखील याचा थेट आर्थिक लाभ प्राप्त होतो म्हणूनच याला ग्रामीण अर्थव्यवस्थेत अधिक मोल आहे. सण साजरा करताना संस्कृतीचा प्रसार देखील होतो. मेळे, आर्केस्ट्रा आदी काळाच्या मागे पडले असले तरी गणेशोत्सव मंडळी विविध प्रकारच्या स्पर्धा या काळात घेतात यामुळे सर्वांना आपल्या कलागुणांना जगासमोर मांडण्याची संधी मिळते. विविध गणेश मंडळे सामाजिक उपक्रमांवर भर देतात यातून समाजात अनेक चांगली कामे याच काळात होताना दिसतील सोबतच अन्नदानाचे महत्त्व जाणून या काळात मोठ्या प्रमाणावर अन्नदान करणारे भंडारा सारखे उपक्रम या १० दिवसात अधिक होतात. आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे देखील या गणेशोत्सवात अनेक गणेश मंडळे आयोजित करतात. समाजातील आबालवृद्धांचा प्रत्येकाचा असा हा लाडका सण म्हणजे कला, साहित्य, संस्कृतीची एक पर्वणी असते अनेक पैलूंसह सामाजिक जाणीव प्रगल्भ करणारा उत्सव म्हणून याकडे बघितले पाहिजे आता लगबग बाप्पाच्या आगमनाची.



श्रावण मासअखेर पासुन हिंदु रितीरिवाजाप्रमाणे सण उत्सव एका पाठोपाठ एक येण्यास सुरूवात होत असते, सण उत्सवामध्ये सजावटीसाठी झेंडुचे विविध प्रकारची फुलांची मागणी बघता बीड जिल्हा परिसरात मोठ्या प्रमाणात फुलांची शेती करण्यात आली आहे. चांगल्या पावसामुळे फुलांची शेती अशी बहरून निघाली आहे. गणेश चतुर्थीच्या पार्श्वभुमीवर बीड शहरात चांगल्या प्रमाणे फुलांची आवक झाली आहे.

## बाप्पाच्या सजावटीसाठी बाजारात फुलांच्या माळा

पिंपळनेर । प्रतिनिधी

लाडक्या बाप्पाच्या आगमनाला काही अवधी राहिला आहे. सर्वच ठिकाणी आरास सजावटीची जोरदार तयारी सुरू आहे. मनातील कल्पनाशक्तीला वाव देऊन वेगवेगळ्या पद्धतीची आरास करण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न आहे. अशात बाजारात सध्या कृत्रिम फुलांच्या माळा विक्रीसाठी आल्या असून ,बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरातील बाजारपेठामध्ये अशा विविध रंगांतील फुलांच्या हुबेहूब वाटणाऱ्या माळा अनेकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

काही गल्लोगल्ली फिरणारे कृत्रिम फुलांच्या माळा घेऊन विक्रीस बसलेले नजरेस पडतात. या माळांमध्ये वापरलेले रंग आणि त्याची बनावट पाहताच क्षणी ग्राहकांना भुरळ पाडत आहे. या ठिकाणी झेंडूच्या माळा, जास्वंद फुलांच्या माळा, दारावर लावण्यासाठी आंब्याचे, झेंडूचे, चमेली आणि लिली फुलांचे गुलदस्ते, फुलदाणीमध्ये ग्राहक होताहेत आकर्षित कृत्रिम फुले ही चायनावरून येतात.काही भारतातही बनवलेले असतात आम्ही ही फुले बीडमध्ये असणाऱ्या होलसेल व्यापाऱ्याच्या गोदाममधून घेऊन येतो. – सिद्धेश्वर तिरगुळ, फूल विक्रेता व्यापारी विक्रीसाठी ठेवलेल्या फुलांपैकी झेंडूच्या फुलांना अधिक मागणी आहे. फुटांप्रमाणे या माळांची किंमत ठरवली आहे. अगदी तीन फुटांच्या माळांपासून ते ५ फुटांच्या माळांपर्यंत झेंडूचे हार विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तीन फुटांच्या तोरण अथवा हारासाठी शंभर रुपयांपासून सुरुवात होते, परंतु सांगताना २०० रुपये भाव सांगितला जातो. ही किरकोळ स्वरूपातील खरेदी असल्यामुळे ग्राहक ज्याप्रमाणे ठरवून हातोहात माळांची विक्री करतात. बाप्पासमोर ठेवण्यासाठी खास फुलदाण्याही विक्रीस ठेवल्या आहेत. या फुलदाण्यांमध्ये जी फुले ठेवली जातात, तीही वेगवेगळ्या प्रकारची फुले या ठिकाणी उपलब्ध आहेत.

## पिंपळनेरात गणेशोत्सवानिमित्त पोलिसांचा बंदोबस्त

पिंपळनेर । प्रतिनिधी

यंदाच्या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने पिंपळनेर शहरात उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. गणेशोत्सव खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. उत्साहाचे वातावरण आणि उत्सव काळात सुरक्षा व्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पिंपळनेरातील पोलिस दल सज्ज आहे. उत्सवाच्या अनुषंगाने तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाईचा बडगा उगारण्याचे काम सुरू आहे. सोशल मीडियावरही पोलिसांची नजर आहे. सीसीटीव्ही कॅमेरेही सुरू करण्यात आले असून इतर खबरदारीचे उपायही योजण्यात आले आहेत. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. साहा. पोलिस निरीक्षक घुगे साहेब आदींच्या मार्गदर्शनाखाली मोठा बंदोबस्त तैनात राहणार आहे.

## 'ड्रोन'मुळे गावकरी जागे, तावडीत सापडले चोरटे; तिघांना गावकऱ्यांकडून बेदम चोप

केज । प्रतिनिधी



तालुक्यातील कानडीमाळी गावावरून गुरुवारी रात्री साडेनऊ वाजे दरम्यान ड्रोन उडत असल्याने गावकरी जागे झाले. याच वेळी गावात आलेल्या एका जीपमधील संशयितांची चौकशी असता त्यात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेले चोरटे गावकऱ्यांच्या हाती लागले.

गावकऱ्यांनी तीन संशयित चोरटय़ांना बेदम मारहाण करून पोलीसांच्या स्वाधीन केले. तर यावेळी एकजण फरार होण्यात यशस्वी झाला. कानडी माळी गावात रात्रीच्या वेळी ड्रोन फिरुन लागल्यामुळे गावकरी घाबरून जागे राहुन गस्त घालीत होते. यावेळी एक जीप ( एमएच ४५ एन ३४५१) कानडीच्या बस स्टँडवर आली. गावकऱ्यांनी गाडीला वेढा घालून विचारपूस केली असता चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. गावकऱ्यांनी गाडीची झडती घेतली असता त्यात हत्यारे आढळून आले. गाडीत दरोडेखोर असल्याचा उलगडा होताच गावकऱ्यांनी आतील तिघांना ताब्यात घेत बेदम चोप देत बांधून ठेवले. तर अंधाराचा फायदा घेत एक चोरटा फरार झाला.

सदर घटनेची माहिती गावकऱ्यांनी पोलिसांन देताच. केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, राजू वाघमारे, चंद्रकांत काळकुटे, नितीन जाधव, होमगार्ड बाळू थोरात, विजय वनवे हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. राहुल विकास काळे ( १८ रा सरमकुंडी) , श्रावण महादेव काळे ( २० रा केवड), अमोल सटवा घुले ( २१ ) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी तिन्ही चोरट्यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

◆ पान १ वरून पुढे...

### धनंजय मुंडेंच्या नाथ....

गौरव मोरे, श्रेया बुगडे व इतर

१४ सप्टेंबर, शनिवार : महाराष्ट्राची हास्य जत्रा सहभाग – समीर चौगुले, पृथ्वीक प्रताप, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, शिवाली परब, चेतना भट व इतर.

१५ सप्टेंबर, रविवार : अजय अतुल लाईव्ह, जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय व अतुल गोगावले यांचा ५० कलाकारांच्या संचासह लाईव्ह गीतांचा कार्यक्रम.

१६ सप्टेंबर, सोमवार – प्रसिद्ध गायक आनंद शिंदे व टीमचा भीमगीतांचा खास कार्यक्रम.

दरम्यान या गणेश महोत्सवाच्या निमित्ताने धनंजय मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून परळी वासियांना तसेच बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी अनुभवास मिळणार असून या गणेश महोत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे व कार्यक्रमांचा आनंद घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मीक अण्णा कराड यांनी केले आहे.

### ईडब्लूएस फायद्याचं...

म्हणून एसीबीसीमधून फॉर्म भरलेले मुलं सुद्धा बाहेर काढत आहात, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी करतानाच सरकारला आणि भाजपला आव्हान देत जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्यांना तुम्ही आरक्षण दिलं नाही, तर तुमचे ११३ आमदार पाडणार, असा इशारा जरांगे पाटील यांनी देत तुमच्याकडे सत्ता आहे आरक्षण द्या, नाहीतर मराठा सत्तेवर येणार, असे ही जरांगे पाटील यांनी म्हटले.

गेवराई येथे गुरुवारी घोंगडी बैठकीत मनोज जरांगे पाटील बोलत होते. पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, फडणवीस साहेब तुम्ही मराठ्यांच्या नादी लागू नका तुम्हाला महागात पडेल. मराठा सगळी भाजपा संपवतील. आणखी आम्ही आमच्या औकातीवर उतरलो नाहीत. मी यांना कायम शांत रहा असं सांगतोय. एकदा हे बिघडले तर तुम्हाला महाराष्ट्रात सभा घ्यायला सुद्धा मुश्किल होईल. आम्ही तुम्हाला धमकी देत नाहीत. तुम्ही आमची कदर करत नाहीत. मराठ्यांच्या विरोधात जायचं काम करू नका, मराठ्यांना त्यांच्या हक्काचे ओबीसीतून आरक्षण देऊन टाका. अनेक जातींनी कोणतेही आंदोलन न करता आरक्षण मिळवले, नोकऱ्या मिळवल्या मराठा कधीही आडवा आला नाही, आता मराठा हक्काचे आरक्षण आंदोलन करुन मागत असताना तुम्ही आडवे का येता? असा प्रश्न उपस्थित करत आता हैदराबाद, सातारा तसेच मुंबई गॅझेट हे तिन्ही उपलब्ध झाले आहेत, त्यामुळे छगन भुजबळांच्या सतरा पिढ्या आडव्या आल्या तरी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाला रोखू शकत नाही, असेही जरांगे पाटील यांनी शेवटी सांगितले

## बीडमध्ये उत्कृष्ट देखावा सादर करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळास लाखांचे बक्षीस

### कल्पतरू प्रतिष्ठानचा उपक्रम ; नोंदणी करण्याचे डॉ.योगेश, डॉ.सारिका क्षीरसागर यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी



बीडमध्ये उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केले आहे.

गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक गणेश मंडळ लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी तयार असून गणरायाचे आगमन एका दिवसावर येऊन ठेपले आहे. यावर्षी कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास १ लाख १ हजार, द्वितीय क्रमांकास ५१ हजार आणि तृतीय क्रमांकास ३१ हजार इतक्या रक्कमेचे पारितोषिक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांच्या देखाव्यांची निवड करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, व्यंकटेश वैष्णव, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी नोंदणीसाठी श्रीमंत तोंडे ८३२९२५९२९५ व नागेश शेटे ७०५७०२६८७७ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### शिक्षकांना प्रेरणा देण्याचे...

#### शारदा प्रतिष्ठानने केलेला सत्कार माझ्या काळजाजवळचा आहे: अविनाश कांबीकर

सत्काराला उत्तर देताना अविनाश कांबीकर म्हणाले की, आजचा सत्कार सोहळा माझ्यासाठी भावनिक असून शारदा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येणारा सत्कार माझ्या काळजा जवळचा आहे. शिक्षक हा चांगला प्रवक्ता असून त्याचा सन्मानपूर्वक सत्कार अमरसिंह पंडित शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून करत आहेत, ही गोष्ट आनंद देणारी आहे असेही ते यावेळी म्हणाले.

**शारदा प्रतिष्ठान प्रतिष्ठा देणारे प्रतिष्ठान आहे: धर्मराज करपे**– शिक्षक आणि समाजाची प्रतिष्ठा जपणारे, सामाजिक बांधिलकी जोपासणारे आणि गेवराई तालुक्याचे मानाचे पान म्हणजे शारदा प्रतिष्ठान आहे. शारदा प्रतिष्ठानने सर्व क्षेत्रा देदीप्यमान काम केले आहे. शारदा प्रतिष्ठानच्या पुरस्कार हा प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. या पुरस्काराने जबाबदारी वाढली आहे, यापेक्षा अधिकचे काम आता करायचे आहे असेही ते म्हणाले. यावेळी आदर्श शिक्षकांच्या वतीने राहुल घाडगे यांनी आपल्या भावना व्यक्त

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. संजय कळमकर यांनी अतिशय मार्मिक पद्धतीने भाष्य करुन उपस्थितांचे उद्बोधन केले. सोळा वर्षे शिक्षकांवर लक्ष ठेवून त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्याचे काम शारदा प्रतिष्ठान करत आहे असे सांगून हे आदर्श शिक्षक समाजासाठी अनिष्ट गोष्टीवर तुरटी फिरवण्याचे काम करतील. मुलांच्या अंगी असलेल्या क्षमता शिक्षकासोबतच पालकांनी ओळखून त्याला घडवले पाहिजे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सुधारण्यापुर्वी शिक्षकांचे व्यक्तीमत्व सुधारले पाहिजे. शिक्षकांने वाचले आणि ऐकले पाहिजे. ग्रंथालयात पुस्तके शिक्षक आणि प्राध्यापकांची वाट पाहत आहेत पण ते तिकडे पोहोचत नाहीत, हे वास्तव असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माधव चाटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाला शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षणप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बैलगाडा शर्यत ग्रामीण ...

स्पर्धक व चालक – मालकांसोबत संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी समवेत माजी पं.स.सदस्य लक्ष्मण काटे, सरपंच सुशांत खरसाडे, माजी सरपंच पोपट रोहिटे, माजी सरपंच वैजनाथ नेवाळे, माजी सरपंच बप्पासाहेब तावरे, विष्णु रोहिटे, उत्तम काटे, आत्माराम काटे, लक्ष्मण रोहिटे, रोहिटे सर, अनिल शेळके सह पंचक्रोशीतील नागरिक व बैलगाडा प्रेमी, शेतकरी बांधाव बहुसंख्येने उपस्थित होते. बीड जिल्ह्यामध्ये देखील पश्चिम महाराष्ट्रा सारख्या स्पर्धा होव्यात यासाठी सर्वात अगोदर पुढाकार घेणारे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी गेल्या दोन वर्षापासून उत्कृष्ट असे बैलगाडा शर्यतीचे आयोजन करत आहेत.

### माजी राज्यमंत्री सुरेश...

दर्जातील मोठ्या देवस्थानाचा विकास करण्यासाठी एकूण १६ कोटी रु.अशी घसघशीत रक्कम मंजूर झाली असल्यामुळे.. या ठिकाणी येणार्या भाविक भक्तांना सुविधा मिळणार आहेत– त्यामुळे ..माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, आणि ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन आमदार पंकजाताई मुंडे यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत..

### शिवाचार्य चंद्रशेखर..

नियुक्ती करण्यात आली. शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव मठात विविध धार्मिक कार्यक्रम घेतले जातात. उत्तराधिकारी झाल्यानंतर मठाधिपती शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी श्रावणातील पहिले २०२२ मध्ये माजलगावकर मठातील प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीजवळ केले होते. दुसरे तपोनुष्ठाण श्रीक्षेत्र कपिलधार येथे तर यंदा श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे तिसरे तपोनुष्ठाण केले. या तपोनुष्ठाणाची सांगता झाल्यानंतर शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी श्रीक्षेत्र कपिलधार येथे संत शिरोमणी श्री मन्मथ स्वामी यांच्या संजिवन समाधीची महाआरती केली. माजलगावकर मठाच्या वतीने सुरु असलेल्या अन्नदानाचे उद्यापन केले. यानंतर सायंकाळी ७ वाजता त्यांचे माजलगाव नगरीत आगमन झाल्यानंतर भक्तांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. माजलगावकर मठ परिसरात शिवाचार्य चंद्रशेखर महाराजांची मिरवणूक काढण्यात आली. मठात आगमन झाल्यानंतर श्री मिस्कीनस्वामी आणि प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या समाधीची महाआरती करुन दर्शन घेतले. यानंतर त्यांनी उपस्थित भाविकांना धर्मोपदेश केला.

### तहसिलदार खोमने साहेब जिल्हा...

क्रबस्तानच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यास टाळाटाळ करीत आहेत. अतिक्रमण न काढल्यास दि.१० सप्टेंबरपासून तलवाड्यातील ५०० ते ६०० मुस्लिम बांधव कुटुंबियांसह गेवराई तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणार असल्याचा इशारा निवेदनातून दिला आहे. निवेदनावर शेख मुखीद शेख अब्दुल, शेख जलील शेख दगडु, खतीब मोमीन अ.मुखीद, शेख अब्दुल रहीम खैरोद्दीन, शेख सिराज शेख नसीर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. तलवाड्यातील या उपोषणाला एमआयएम व जमिअत उलेमा-ए-महाराष्ट्र बीड शाखेने पाठिंबा दिला आहे.

## ◆ थोडक्यात...

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ( मर्या. ) अनुदान योजना व बीजभांडवल योजनांसाठी कर्जप्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ( मर्या. ) जिल्हा कार्यालय बीड करीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजने अंतर्गत १५० लाभार्थी व बीजभांडवल योजने अंतर्गत ४० लाभार्थींचे उदिष्ट प्राप्त झाले आहे. वरील दोन योजना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबविल्या जातात. मातंग सामाजात अंतर्भाव असणाऱ्या बारा पोटजातीतील अर्जदाराकडून विविध व्यवसायासाठी कर्ज प्रस्ताव मागविण्यात येत आहे. या समाजातील लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांनी या पुर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. तसेच अर्जदाराने महामंडळाच्या नियमाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत खालील ठिकाणी स्वत: अर्जदाराने मुळ कागदपत्रासह उपस्थित राहुन दाखल करावेत. त्रयस्थ/मध्यस्थामार्फत कर्ज प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत. वरील दोन्ही योजनेचे कर्जमागणी विहीत नमुन्यातील अर्ज विनामुल्य कार्यालयात उपलब्ध असून आपण स्वत: येऊन कर्ज मागणी अर्ज भरुन दि. १० सप्टेंबर २०२४ ते दि. १० ऑक्टोबर २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.१५) स्थळ जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकिय विश्रामग्रहासमोर नगर रोड बीड या ठिकाणी स्विकारले जातील. बीड जिल्हातील प्रत्येक तालुक्यातील मांग/मातंग समाजातील बेरोजगार युवक-युवतींनी तसेच होतकरु, गरजु अर्जदारांनी या महामंडळाच्या योजनेचा जास्तीत लाभ घ्यावा, असे आवाहन आर.एन.पवार जिल्हा व्यवस्थापक बीड यांनी केले आहे.

### शांताई अर्बन मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी




**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सामाजिक व आर्थिक क्षेत्रात नावाजलेली शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी बार्शी रोड बीड येथे भारताचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदरणीय डॉ. श्रीमंत तोंडे सर, विजयश्री तिडके मॅडम शांताई अर्बनचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षकांच्या कामगिरीसाठी साजरा केला जातो तो दिवस म्हणजे शिक्षक दिन आणि शिक्षक दिनाचे औचित्य साधून शांताई अर्बन तर्फे शैक्षणिक क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या बीड मधील के. एस. के महाविद्यालयांमध्ये इंग्रजी विभाग प्रमुख आहेत त्यांनी आतापर्यंत बऱ्याच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व त्यांची जडणघडण मध्ये मोलाचा वाटा आहे तसेच गीते मॅडम यांनी आपल्या विक्टरी प्राइमरी स्कूलच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाची आवड निर्माण करून कलागुणांना त्यांची स्किल समोर आणण्याचे काम हे मॅडम सातत्याने करत असतात या दोघांच्या कर्तुत्वान सत्कार मूर्तीची कार्याची दखल घेत यांचा सत्कार शांताई अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे व संस्थेची उपाध्यक्ष संदीप वाघमारे सर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शांताई अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष संदीप वाघमारे, संचालक परमेश्वर शिंदे , आरती कुलकर्णी, राजेंद्र काळे व सर्व संचालक मंडळ कर्मचारी आणि पिग्मी एजन्ट उपस्थित होते.

### उपशिक्षणाधिकारी भरती प्रक्रिया सात वर्षापासून रखडली

माजलगावच्या शिक्षकांचे शिक्षक दिनापासून मुंबई येथे आमरण उपोषण सुरू




**माजलगाव । प्रतिनिधी**

उपशिक्षणाधिकारी भरती प्रक्रिया सात वर्षापासून रखडली असून ही भरती प्रक्रिया राबविण्यात यावी यासह विविध मागण्यासाठी माजलगाव तालुक्यासह राज्यातील तीस शिक्षकांच्या शिक्षक हक्क कृती समितीच्या वतीने शिक्षक दिनापासून आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे गट ब २०१७ या चझडउ ने जाहिरात क्र. ४०/२०१७ द्वारे घेतलेल्या परीक्षेला ७ वर्षे होऊन गेली. परंतु; न्यायालयीन प्रकरणाचे कारण देऊन शासन व एमपीएससी यांचेकडून अंतिम गुणवत्ता यादी व शिफारशी यादी तसेच नियुक्ती रखडलेली आहे. मात्र याच परीक्षेतील २९ उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असताना गेल्यावर्षीच नियुक्त्या दिलेल्या आहेत. यासंदर्भात शिक्षण विभागाच्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांना व चझडउ ला वारंवार निवेदन दिली आणि प्रत्यक्ष अनेक भेटी घेतल्या पण, ते प्रक्रिया पार पाडण्यास दुर्लक्ष करत आहेत. याच परीक्षेसंबंधी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण आणि मा. उच्च न्यायालयाने प्राथमिक शिक्षक यांना पात्र केलेले आहे व प्रक्रिया लवकर पार पाडण्यास यापूर्वी आदेशित केले होते. तरीही चझडउ आणि शासनाने ही प्रक्रिया पार पाडली नाही. २०१७ पासून आम्हा शिक्षकांवर या प्रक्रियेबाबत अन्याय'होत आहे. सदर उपशिक्षणाधिकारी परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी व शिफारस यादी लवकरात लवकर लावून नियुक्त्या मिळाव्यात यासाठी शिक्षक दिनी ५ सप्टेंबर, २०२४ पासून आझाद मैदान, मुंबई येथे माजलगाव तालुक्यासह राज्यातील तीस शिक्षकांच्या राज्य एमपीएससी उपशिक्षणाधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा - २०१७ शिक्षक हक्क कृती समितीच्या वतीने शिक्षक दिनापासून आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण सुरू केले आहे.

---

**दुबार मतदानाचा हक्क बजवणाऱ्या २५१६१ बोगस मतदारांची नावासह यादी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सुपूर्द!**

# प्रस्थापित राजकारण्यांनी विजयाची समीकरणे जुळून आणण्यासाठी लोकशाहीची गळचेपी केली: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील प्रस्थापित राजकारण्यांनी स्वतःच्या विजयाची समीकरणे जुळून आणण्याकरिता बोगस मतदारांची नावे मतदान यादीत लावून घेतली असून ही बोगस मतदारांच्या नावांची संख्या तब्बल २५१६१ एवढी मोठी असल्याचे समोर आले आहे. सर्व यादी तपासली असता २५१६१ मतदारांची नावे ग्रामीण आणि शहरी भागातील दोन्ही मतदान यादीत असल्याचे आढळून आले आहे.

मतदान यादीत दोनदा नाव असल्याने ही मतदार दोन वेळा मतदानाचा हक्क बजावत आले आहेत. लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या या अत्यंत महत्वपूर्ण मुद्यावर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी आवाज उठवला असून काल दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान २३०-बीड विधानसभा मतदार संघामध्ये असणाऱ्या २५१६१ दुबार नावांची यादी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे मा. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बीड यांच्याकडे प्रत्येकी एक प्रत शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सुपूर्द केली. याबरोबरच दुबार




मतदारांच्या यादीबाबत तात्काळ योग्य ती कारवाई करून लोकशाहीची गळचेपी करणारा प्रस्थापितांचा हा अनधिकृत असलेला घाणेरडा डाव हाणून पाडावा असे आवाहन देखील जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बीड यांना शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या वतीने निवेदन देण्याकरिता शिवसेना जिल्हा संघटक सुनील भाऊ सुरवसे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष भाऊ जाधव, शिवसेना उप-तालुकाप्रमुख भारतजी देवकते, शिवसेना उप-शहरप्रमुख हनुमानप्रसादजी पांडे, आकाश जगताप, प्रतिक कांबळे, सखाराम सातपुते यांच्यासह आदी उपस्थित होते.

**● दुबार मतदान करणाऱ्यांनो सावधान, शिवसैनिकांची आता नजर तुमच्यावर- अनिलदादा जगताप**

**बोगस मतदान करणाऱ्यास एक वर्ष सश्रम करावासाची शिक्षा आणि पाचशे रुपये दंड असून मतदान यादीत दोनदा नाव असणाऱ्यांची यादी नावासह प्रत्येक पोलिंग बूथवर जाहिरात फलकाची उभारणी करून प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यामुळे विधानसभा निवडणुकी दरम्यान नेत्या पुढऱ्याचं बळ पाठीशी आहे म्हणून कुणीही दुबार मतदानाचा हक्क बजावू नये, शिवसैनिकांची आता करडी नजर प्रत्येक बूथवर बोगस मतदान करणाऱ्यांवर असणार आहे. दुबार मतदान करताना कुणी आढळून आल्यास शिवसेनेकडून त्यास त्याच ठिकाणी योग्य तो जाब देण्यात येईल असा आवाहनात्मक इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बोगस मतदान करणाऱ्यांना दिला आहे.**

---

## गुरुकृपा इन्स्टिट्यूटमध्ये राज्यस्तरीय पोस्टर प्रदर्शन स्पर्धा

**मराठवाड्यातील फार्मसी कॉलेजच्या १२५ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग**

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे गुरुवारी (ता. पाच) पाचवी राज्यस्तरीय पोस्टर प्रदर्शन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मराठवाड्यातील डी. आणि बी. फार्मसी महाविद्यालयातील १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हि स्पर्धा घेणारी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट हि एकमेव संस्था आहे.

माजलगाव येथील गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी राज्यस्तरीय पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात येते. शिक्षक दिनाचे औचित्य साधत घेण्यात आलेल्या या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ गुरुवारी (ता. पाच) संपन्न झाला. यावेळी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले, नांदेड विद्यापीठाचे विभाग प्रमुख डॉ. शैलेश पटवेकर, डॉ. कल्याणकर, प. पु. गुरु माउली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद विद्यालयाच्या विभागप्रमुख संगीता देशमुख, पत्रकार सुभाष नाकलगावकर, पांडुरंग उगले, हनुमान कासट, प्राचार्य अमित बिंदू आदी उपस्थित होते. या स्पर्धेत बी. फार्मसी गटातून प्रथम परमेश्वर मुंडे (दयानंद कॉलेज, लातूर) द्वितीय ऋषिकेश मोहाले, पंढरीनाथ केदार (आदित्य



कॉलेज, बीड) तर, तृतीय पारितोषिक तृप्ती पोपळे (सरस्वती कॉलेज, हिंगोली) डी. फार्मसी गटातून प्रथम अनुजा भावसार, गायत्री भोसले (दयानंद कॉलेज, लातूर) द्वितीय सय्यद तरवीन अनिस, ज्ञानेश्वरी डाके (गुरुकृपा इन्स्टिट्यूट, माजलगाव) तृतीय पारितोषिक सानिका पवार, ऋतुजा राजमाने (चन्नाबसवेश्वर कॉलेज, लातूर) आयुर्वेद पद्वित्युर पदवी गटातून प्रथम पारितोषिक डॉ. श्रीकांत राजमाने (गडहिंग्लज कॉलेज, कोल्हापूर) तर, आयुर्वेद पदवी गटातून प्रथम दिपाली पतंगे, शैलेजा कोडेवाड (प.पु. गुरुमाउली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद कॉलेज, माजलगाव) द्वितीय विष्णू झरकर, अनिता काकडे (आदित्य आयुर्वेद कॉलेज, बीड), तृतीय असिफ शेख, शेख नदीम (प.पु. गुरुमाउली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद कॉलेज, माजलगाव) या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत यश मिळवले, विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते रोख रक्कम, प्रमाणपत्र, ट्रॉफी देण्यात आली.

### शंकर आण्णा दराडे यांचे निधन परिसरामध्ये शोककळा



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी येथील प्रतिष्ठीत नागरिक व पत्रकार नूज पेपर डिजाईनर अंगद दराडे व महाराष्ट्र मुबंई पोलीस ओमप्रकाश दराडे,. संभाजी दराडे यांचे वडिल शंकर अण्णा दराडे यांचे गुरुवारी सकाळी ९ वाजता निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्या मागे ३ मुले, १ मुली, जावई, सुना, नातवंडे माझी सरपंच सुखदेव ( माणिक )दराडे बंधू सह दोन पुतणे सुना, नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी गुरुवारी दुपारी घळाटवाडी येथे करण्यात आला.

### आष्टी तहसीलदार पदाचा वैशाली नेमगोंडा पाटील यांच्या कडे कारभार



**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून आष्टी तहसीलदार पद हे रिक्त असल्याने अनेक कामे खोळंबली होती. शुक्रवार (दि.६) रोजी दुपारी ३ वाजता नागपूर येथील वैशाली नेमगोंडा पाटील यांनी आष्टी तहसीलदार चा पदभार स्वीकारला आहे

येथील तहसीलदार प्रमोद गायकवाड यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी नियुक्ती मिळालेल्या तहसीलदार वैशाली नेमगोंडा गेल्या दिड महिन्यांपासून रुजू न झाल्याने आष्टी तहसीलदारांचे पद रिक्त होते. यामुळे नागरिकांची कामे खोळंबली असून प्रचंड गैरसोय होत होती. शुक्रवार दि.६ रोजी दुपारी ३ वा. नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात असलेल्या वैशाली नेमगोंडा पाटील यांनी आष्टी तहसीलदार पदाचा पदभार स्वीकारला आहे. त्यांनी यापूर्वी माजलगाव, धारुर, येथे तहसीलदार पदावर काम केले आहे. आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार अक्षय विधाते, कऱ्हेवडगावचे या. सरपंच जालिंदर गायकवाड, ड. विकास आजबे यांच्या सह महसूल कर्मचारी यांनी सत्कार केला.

---

### आदित्य महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षेच्या क्लासेसमुळे मी क्लास वन अधिकारी झालो

**सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी सुदाम मुंडे**



**बीड । प्रतिनिधी**

आदित्य महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी मला एमपीएससीचा 'म' देखील माहित नव्हता. २०१३ साली आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेव्हा महाविद्यालयात शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जात होती. मी देखील महाविद्यालयात एमपीएससीची तयारी सुरू केली. महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्याकडून मला एमपीएससी बद्दल सखोल माहिती आणि मार्गदर्शन मिळाले अन तेथेच मी अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. आज आदित्य शिक्षण संस्थेमुळेच मी क्लासवन अधिकारी झालो असे असे प्रतिपादन सहाय्यक वन संरक्षक क्लासवन अधिकारी सुद्धा मुंडे यांनी केले. नुकतेच सुदाम नरहरी मुंडे यांची वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावरून सहाय्यक वन संरक्षक अधिकारी क्लास वन पदी पदोन्नती झाली याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी सन २०१३ ते १५ मध्ये आदित्य शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयात शिक्षण घेतले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्राचार्य श्याम भुतडा सर यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच आज मी अधिकारी झालो असल्याचे यावेळी सुदाम मुंडे म्हणाले. मुंडे यांच्या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालिका डॉक्टर आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, प्रशासकीय अधिकारी डॉ. संतोष लहाने यांच्यासह आदित्य शिक्षण संस्थेतील प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.

## रामगीरी महाराजावर योग्य कारवाई करण्यासाठी पात्रुड येथिल मुस्लीम समाज उतरला रसत्यावर !

**रामगीरी महाराज व आ.नितेश राने च्या विरोधात गुन्हा दाखल करा ; दिंद्रुड पोलिस स्टेशनवर मोर्चा काढण्यात आला**

**माजलगाव । प्रतिनिधी**

रामगीरी महाराजावर योग्य कारवाई करण्यासाठी पात्रुड येथिल मुस्लीम समाज उतरला रसत्यावर

प्रेषित (पैगंबर) हजरत मोहम्मद स.अ.स. यांची बदनामी होईल असे वक्तव्य करणाऱ्या राम गिरी महाराज व मुस्लिम समाजाला मारण्याची धमकी देणाऱ्या आमदार नितेश राणे यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी मौजे पात्रुड येथे आज शुक्रवार रोजी निषेध मोर्चा काढून ग्रामीण पोलिसांना निवेदन देण्यात आले.

काही दिवसांपूर्वी एका सप्ताहा दरम्यान रामगिरी महाराज यांनी हजरत पैगंबर मोहम्मद स.अ.स. यांच्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्या बद्दल मुस्लिम समाजाचे भावना दुखावले आहे. जाणून बुजून असे वक्तव्य करून कायदा व सुव्यवस्था बिघडवणाच्या हेतूने रामगिरी महाराज यांनी हे वक्तव्य केले असून सदरील प्रकरणी




मुस्लिम समाजाच्या भावना दुखावले गेले आहे. भारत देश हा धर्मनिरपेक्ष असून लोकशाही माननारा देश आहे. संविधानाने दिलेल्या अधिकाराने आज देशात प्रत्येक व्यक्ति आपल्या आपल्या धर्मांचे पालन करू शकतो. सर्वधर्म समभावची शिकवण देणारा हा देश रामगिरी महाराज सारख्या लोकांचे विचार कधीच कोणाला पटणार नाही. तसेच काही दिवसापासून

आमदार नितेश राणे सुद्धा मुस्लिम समाजाबद्दल गरळ ओकत आहे. दि. ०१/०९/२०२४ रोजी अहमदनगर जिल्ह्यात आमदार नितेश राणे याने दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशा हेतूने बेताल वक्तव्य करून मुस्लिम समाजाला मसजीद मध्ये घुसून चुन चुन के मारेगे अशी धमकी दिली आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या असून रामगिरी महाराज व आमदार नितेश राणे हे जाणून बुजून महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था बिधळवण्याच्या हेतूने बेताल वक्तव्य करीत असून तत्काल त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी. या मागणीसाठी आज मुस्लीम बांधवांच्या वतीने दिंद्रुड पोलिस स्टेशनवर मोर्चा काढण्यात आला. यावेळी ग्रामीण पोलिसांना निवेदन देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली.हजारोंच्या संख्याने मुस्लिम समाज उपस्थित होता.

---

## शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाची तात्काळ दखल घ्या

**अन्यथा ८ सप्टेंबर पासुन जिल्ह्यात विविध ठिकाणी आक्रमक आंदोलन छेडणार: कुलदीप करपे ; शेतकरी क्रांति मोर्चा संघटनेचे राज्य शासनाला बीड,केज, पाटोदा, परळी, गेवराई तहसीलदार मार्फत निवेदन**

**बीड । प्रतिनिधी**

सोयाबीन,कापूस ,प्रश्नांवर ४ सप्टेंबर २०२४ पासून शेतकरी नेते रविकांत तुपकर सिंदखेडराजा येथील राजमाता जिजाऊच्या स्मृती स्थळावर बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला बसले आहेत.त्यांच्या आंदोलनाची राज्य शासनाने तात्काळ दखल घेण्यासाठी गुरुवारी बीड,केज,पाटोदा, परळी ,गेवराई तहसील कार्यालयात शेतकरी क्रांती मोर्चाचे अध्यक्ष श्री. कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली तरूण शेतकऱ्यांनी निवेदन दिले. सोयाबीन ला ९००० रु कापसाला १२००० रु ऊसाला ५००० रु भाव देण्यात यावा थकित पीकविमा तात्काळ वाटप करावा ,अतिवृष्टीमुळे बाधीत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी.जंगली प्राण्यांपासुन संरक्षण करण्यासाठी पक्के तार कम्पाउंड करणे आदी प्रमुख मागण्या निवेदनात नमूद आहेत. यावेळी पेशकार श्री. जे. पी.ननावरे यांनी निवेदन स्वीकारले.शेतकरी क्रांती मोर्चा संघटनेच्या शिष्टमंडळात अध्यक्ष कुलदीप करपे जि.कार्याध्यक्ष



शरद इंगळे,केज तालुकाध्यक्ष अतुल गवळी ,केज शहराध्यक्ष फेरोजभाई पठाण ,सुग्रीव करपे,पिनू गोरे, सुरेश गोंडे,संतोष गायकवाड, संदीप भाकरे, उमेश गायकवाड,किरण चाळक,दुर्वेश गालफाडे,विकास करपे , अर्जुन गायकवाड,मनोज शिंदे,अक्षय करपे आदी उपस्थित होते.

पाटोदा जि. बीड तहसीलदार कार्यालयात गुरुवारी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाची दखल घेण्यासाठी शेतकरी क्रांति मोर्चाचे तालुकाध्यक्ष श्री. आकाश चौरे यांनी गुरुवारी सहकाऱ्यांसह निवेदन दिले. परळी, गेवराई, बीड तहसील कार्यालयात श्रीकृष्ण चाटे, उद्धव साबळे, लहू गायकवाड पाटिल यांनी निवेदन दिले.

शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करा अन्यथा बीड जिल्ह्यात आक्रमक आंदोलन छेडू-कुलदीप करपे (अध्यक्ष, शेतकरी क्रांति मोर्चा,महाराष्ट्र)- शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भात राज्य सरकार असंवेदनशील असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. शेतकऱ्यांचे सोयाबीनला भाव नसल्याने सोयाबीन दोन-तीन वर्षापासून घरात पडून आहे. याबाबत शासन कोणतेही धोरण करत नसून शेतकऱ्यांचे बळी घेत आहे. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाची शासनाने तात्काळ दखल घेऊन मागण्या मान्य कराव्यात अन्यथा ८सप्टेंबर पासून जिल्ह्यात दररोज विविध मार्गावर आक्रमक आंदोलन छेडण्यात येईल.





आज घरोघरी बाप्पाच्या आगमनाची लगबग सुरु...

# शिक्षकांना प्रेरणा देण्याचे काम शारदा प्रतिष्ठान करत आहे : प्रा.डॉ. संजय कळमकर

## ■ शारदा प्रतिष्ठानचे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा थाटामाटात संपन्न ■




**गेवराई । प्रतिनिधी**

समाज जेवढा शिक्षकांना पाठींबा आणि प्रेरणा देईल तेवढा शिक्षक चांगले काम करुन एक निकोप पिढी घडवेल. अमरसिंह पंडित शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिक्षकांना प्रेरणा देण्याचे चांगले व उत्कृष्ट काम करत आहेत असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.संजय कळमकर यांनी केले. ग्रामीण भागात गुणवत्ता आहे, त्या विद्यार्थ्यांना संधी दिली तर विद्यार्थी घडू शकतील, शिक्षकांनी या दृष्टीने काम करण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले. शारदा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात गेवराईचे भुमिपुत्र अविनाश कांबीकर यांचा शारदा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणी गुरुजनांचा गौरव करण्याच्या उद्देशाने मागील पंधरा वर्षांपासून शारदा प्रतिष्ठान सातत्याने शिक्षक दिनी आदर्श शिक्षकांना पुरस्कार देवून गौरव केला जात असून प्रतिष्ठानचा १६ वा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात ५ सप्टेंबर शिक्षकदिनी र.भ. अट्टल महाविद्यालच्या गोदावरी सभागृहाम ध्ये मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या समारंभाला सुप्रसिध्द व्याख्याते डॉ.संजय कळमकर, सुलतान चित्रपटाचे दिग्दर्शक तथा गेवराईचे भुमिपूत्र अविनाश कांबीकर, शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप, प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर, निवड समितीचे अध्यक्ष नारायणराव मोटे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष सुभाष शिंदे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, प्रभाकर पराड, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

### ▸सत्कार सोहळ्यात झालाया गुरुजनांचा गौरव

**जि.प.प्रा.शाळा राजपिंप्रीचे मुख्याध्यापक धनंजय सुलाखे, जि.प.प्रा. शाळा अर्धपिंप्रीचे शिक्षक डॉ.राहुल घाडगे, जि.प.प्रा. शाळा आम्लाचे शिक्षक भारत काकडे, जि.प.प्रा. शाळा मुधापूरीच्या शिक्षिका श्रीमती रंजना गायसमुद्रे, मोहिमाता विद्यालय मादळमोहीचे शिक्षक गुलाब शेख, जि.प.प्रा.शाळा नागरे वस्तीचे शिक्षक भगवान नागरे, जि.प. माध्यमिक शाळा उमापूरचे शिक्षक धर्मराज करपे, जि.प.प्रा. शाळा तळणेवाडीचे शिक्षक डॉ.संजय पांढरे, जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य वसंत राठोड, जि.प.प्रा. शाळा माळापूरी, ता.बीडचे शिक्षक ब्रम्हनाथ घोडके आणि जि.प.प्रा. शाळा हरकी निमगाव, ता.माजलगावचे शिक्षक लक्ष्मण सरवदे या अकरा शिक्षकांना सन २०२४ चा आदर्श शिक्षकांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शालश्रीफळ देवून सपत्नीक गौरव करण्यात आला.**

### शिक्षकांनी गुणवंतांना संधी देण्याचे काम करावे: अमरसिंह पंडित

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अमरसिंह पंडित म्हणाले की, शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान प्रतिष्ठान करत असून आजच्या काळात शिक्षणक्षेत्र विविध कारणांमुळे बदनाम होत असून हि चिंतेची बाब आहे. ग्रामीण भागात खरी गुणवत्ता आहे, प्रतिकूल परिस्थितीत ते अटकेपार झेंडे लावत आहेत. शिक्षकांनी अशा गुणवंतांना संधी देऊन पुढे आणण्यासाठी काम केले पाहिजे. गेवराईचे भुमिपुत्र अविनाश कांबीकर यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जिवनावर ' सुलतान ' हा लघुपट तयार करुन जर्मन स्टार ऑफ इंडिया नामांकन मिळवले, ही गेवराई विधानसभा मतदारसंघासाठी अभिमानास्पद गोष्ट असून त्यांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्याचे भाग्य लाभले असेही ते यावेळी म्हणाले.

....(उर्वरित पान २ वर)

## ◆ थोडक्यात...

### पुनम मुरलीधर रोकडे यांचे सेट परीक्षेत यश



**केज । प्रतिनिधी**

पुनम मुरलीधर रोकडे यांनी पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या सेट परिक्षेमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँन्ड एप्लिकेशन या विषयामध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. केज तालुक्यातील मौजे साबला येथील रहिवाशी मुरलीधर रोकडे यांच्या कन्या तसेच सुशील रोकडे यांच्या बहिण पुनम मुरलीधर रोकडे यांनी पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या सेट परिक्षेमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँन्ड एप्लिकेशन या विषयामध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण जवाहर विद्यालय केसापुरी कॅम्प येथे झाले असुन उच्च शिक्षण हे डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर येथे झाले व कॉम्प्युटर सायन्स अँन्ड एप्लिकेशन या विषयात त्या सेट परिक्षा उतीर्ण झाल्या आहेत. त्यांचे पूर्वीचे शिक्षण चडउ,च.हिळश्र,झक्ऊझाले असुन सेट परीक्षा उतीर्ण झालेमुळे त्यांच्या शिक्षणात भर पडली आहे यासाठी त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात असून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### लक्ष्मण मच्छिंद्र हजारे या युवकाला न्याय कधी भेटणार,

लक्ष्मण हजारे या युवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले पत्र



**बीड । प्रतिनिधी**

मी लक्ष्मण मच्छिंद हजारे मी राहणार जामखेड ता जि अहमदनगर इथला एक नागरिक आहे , माजी ऐवढीच विनंती आहे कि तुम्ही माज्या पुढच्या कामाला मला तुमची साथ हवी ,इकडे माजी बहीण दोन महिन्या पासून बेपत्ता आहे ,मला आई वडील नाही, मी एक अनाथ बालक आहे ,मला ब्रेन चा आजार आहे. मी एकटा राहतो मला माज्या चुलत्या पासून खूप त्रास होतोय, त्यानी माज्या ताई आणि दाजी ला लांब करून आमच्या जमीनीवर त्याचा डोळा आहे आणि नंतर माज्या सख्या भावाला गावाकडे बोलून त्याला पण खाऊ पिऊ काय नाही दिले तर त्याला मग तो पन पैसेन्ट बनला आणि मयत झाला नंतर माज्या वडीलांना दारू मधी विष टाकून मारून टाकले ,मग आता माज्या बहिणी च्या मागे पण लागलेत बहीण चा जबरस्ती करून डिओस करायला लावला ,त्यांच्या लग्नाला १०वर्ष चागले चालत असताना त्याची काय नवरा बायकोत भांडण तर होतच पण चुलता आणि मामा त्यानी जबदस्ती करून त्याना डिओस द्यायला लावला २०१४ला लग्न झाले एक तर माज्या अंगात रक्त नाही ाळी मी ब्रेन च पेशंट आहे. माझी परिस्थिती नाही साहेब माझ्यासारख्या गरिबाला न्याय मिळवून देताना अशी मी आशा बाळगतो. या युवकांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे.



*हजरत शहिंशाहवली रहे.संदल (ऊर्स) निमित्त आज गांधी नगर बीड येथे दोस्ती ग्रुप वतीने अन्नदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन सर्व मुस्लिम बांधवांना रहे.संदल (उर्स ) च्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पेठ बीड पोलिस स्टेशनचे पी.आय.मोदीराज साहेब, पेठ बीड पोलिस स्टेशनचे मोटे सर,शहर प्रमुख शेख निजाम भाई, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष रवी आण्णा वाघमारे, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष नय्युम भाई,खदीर भाई, विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड,कलीम भाई, वसीम भाई,पाशा भाई सह सर्व मुस्लिम बांधव उपस्थित होते..!!*

# बैलगाडा शर्यत ग्रामीण संस्कृतीची ओळख : राजेंद्र मस्के

## आहेरवडगाव येथे रंगला बैलगाडा शर्यतीचा थरार..!

**बीड । प्रतिनिधी**

बैलगाडा शर्यत महाराष्ट्रातील एक पारंपरिक क्रीडा प्रकार आहे. हौशी शेतकरी आपल्या बैलासह शर्यतीमध्ये आनंदाने भाग घेतात. ज्यामध्ये दोन बैलांचा एकजोड असलेल्या गाडीवर बसलेला शेतकरी त्यांना पळवून स्पर्धा करतो. ही शर्यत विशेषतः गावोगावी सण, उत्सव किंवा विशेष कार्यक्रमा दरम्यान घेतली जाते. बैलगाडी किंवा बैलगाडा हा ग्रामीण भागामध्ये हौशीचा विषय झाला आहे. पूर्वी बैल हा



शेतीकामासाठी त्याचा वापर होयचा. परंतु आता बैलगाडा शर्यतीमध्ये आपला बैल स्पर्धेत टिकावा यासाठी पोटच्या मुलाप्रमाणे शेतकरी त्याच्यावर प्रेम दाखवत आहेत. अशाच स्पर्धा गावोगावी झाल्या पाहिजेत. बैलगाडा शर्यत आपल्या कृषी संस्कृतीची व ग्रामीण महाराष्ट्राची ओळख आहे. ती जोपासली पाहिजे असे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आहेरवडगाव येथे बैलगाडा शर्यत उद्घाटन पसंगी व्यक्त केले.

आज बीड विधानसभा मतदारसंघातील आहेर वडगाव येथे ग्रामस्थांच्या वतीने भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले होते. या बैलगाडा शर्यतीत भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सहभागी होत, बैलगाडा शर्यत, ....(उर्वरित पान २ वर)

# माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी मतदारसंघातील ४ देवस्थानाच्या विकास कामासाठी १६ कोटी रु.मंजूर

### भाविक भक्तांना मिळणार मोठ्या सुविधा

**आष्टी । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील..आष्टी तालुक्यातील श्रीक्षेत्र रेणुकामाता देवस्थान बेलगाव,श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव आणि पाटोदा तालुक्यातील श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी आणि श्रीक्षेत्र आ अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या देवस्थानांच्या विकासासाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास विभागाच्या वतीने १६ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे.. याविषयीची अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्यातील.. ब वर्ग दर्जा असलेल्या देवस्थानाच्या ठिकाणी दरवर्षी भाविक भक्त दर्शनासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.. अशा देवस्थानांचा विकास करणे बाबत.. ग्रामीण विकास विभाग शासन निर्णय दि.६ सप्टेंबर २० २४ नुसार ..आष्टी तालुक्यातील..श्री क्षेत्र रेणुका माता देवस्थान बेलगाव येथे वाहन तळ १०० लक्ष रु., मंदिर परिसर सुशोभीकरण १० लक्ष रु. भक्तनिवास १० लक्ष रु.,संरक्षण भिंत १५४ लक्ष रु.,पुरुष भक्त निवास ८५ लक्ष रु.

पोहोच रस्ता आणि सीडी वर्क १२० लक्ष रु. आणि पेव्हिंख ब्लॉक १० लक्ष रु.असे एकूण ४ कोटी ९० लक्ष रु.श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान



सावरगाव या ठिकाणी प्रसादालय बांधकाम २०० लक्ष रु.वाहनतळ बांधकाम पेव्हर ब्लॉक व कॉंक्रिटीकरण करणे २०० लक्ष रु. असे एकूण ४.०० कोटी रु. पाटोदा तालुक्यातील..

श्री क्षेत्र संत मीराबाई गुरु भगवान संस्थान महासांगवी या ठिकाणी वाहन तळ बांधकाम ४२ लक्ष रु.पुरुष भक्त निवास बांधकाम १०० लक्ष रु. महिला भक्तनिवास बांधकाम ७७.२० लक्ष रु.पोहोच रस्ता २० लक्ष रु.

पोलसह एलईडी लाईट १० लक्ष रु.स्ट्रीट लाईट १० लक्ष रु.,संरक्षण भिंत २० लक्ष रु.आणि सुशोभीकरण २० लक्ष रु.असे एकूण ३ कोटी रु. तसेच श्रीक्षेत्र अश्वलिंग महादेव मंदिर पिंपळवंडी या ठिकाणी प्रसादालय बांधकाम ८२ लक्ष रु.भक्तनिवास ५० लक्ष रु.

संरक्षण भिंत ४५ लक्ष रु.पेविंग ब्लॉक बसवणे ८० लक्ष रु.पोहोच रस्ता तयार करणे ९० लक्ष रु.आणि सुशोभीकरण करून लेव्हलिंग पथदिवे बसवणे ६३ लक्ष रु. असे एकूण ४ कोटी १० लक्ष रु. अशाप्रकारे या चार ब वर्ग ....(उर्वरित पान २ वर)

# शिवाचार्य चंद्रशेखर महाराजांचे माजलगाव नगरीत भव्य स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

वीरशैव समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या माजलगाव येथील मिस्कीनस्वामी मठाचे मठाधिपती शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांनी बारा ज्योर्तिलंगापैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे श्रावणात महिनाभर तपोनुष्ठाण केले. तपोनुष्ठाणाची सांगता झाल्यानंतर ४ सप्टेंबर रोजी त्यांचे माजलगाव नगरीत उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी सायंकाळी ७ वाजता माजलगाव मठ परिसरात शिवाचार्य चंद्रशेखर महाराजांची मिरवणूक काढण्यात आली. माजलगाव येथील मिस्कीनस्वामी मठाचे मठाधिपती प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज



यांच्यानंतर उत्तराधिकारी म्हणून शिवाचार्य चंद्रशेखर महाराज यांची ....(उर्वरित पान २ वर)




# तहसिलदार खोमने साहेब जिल्हा कार्यालयाचे आदेशाला केराची टोपली

▸ तलवाड्यातील कब्रस्तानच्या जागेवर अतिक्रमण धारकांची पाठराखण करत आहेत का ?

▸ येणाऱ्या दहा तारखेला सकल मुस्लिम बांधवाचा कुटुंबीयासह तहसील कार्यालय समोर बेमुदत उपोषणाचा इशारा



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील कब्रस्तानच्या जागेवर मुस्लिम समाजाच्याच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. या संदर्भात गावातील लोकांनी हे अतिक्रमण उठविण्याच्या मागणीसाठी गेल्या काही वर्षापासून वक्फ बोर्ड आणि जिल्हा प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. या प्रकरणात बीड जिल्हाधिकाऱ्यांसह वक्फच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अतिक्रमण हटविण्यासाठी १६ नोव्हेंबर २०२२ मध्ये पत्र दिलेले आहे. तरीही गेवराईचे तहसिलदार अजुन कोणतीच कार्यवाही करीत नाहीत. तहसिलदार खोमने साहेब गेल्या अनेक वर्षापासून हा लढा सुरु आहे. आणखी किती वर्ष टाळाटाळ करायची? असा प्रश्न उपस्थित करत तलवाड्यातील ग्रामस्थांनी दि. १० सप्टेंबर पासून गेवराई तहसिलसमोर कुटुंबियांसह उपोषणाचा इशारा दिला आहे.

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे तलवाडा येथील गट नंबर ५१० मधील कब्रस्तान तसेच दुसरे लहान मुलांचे कब्रस्तान आहे. त्या ठिकाणी मुस्लिम समाजातीलच काही लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. सदरील अतिक्रमण हटवावे, या मागणीसाठी तलवाड्यातील ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, गेवराई तहसिलदार यांना या बाबत आदेशही झालेले आहेत. दोन्ही कब्रस्तान तहसिलदार यांनी मंडळ अधिकारी व तलाठी पाठवून पंचनाम्याचे आदेश झाले होते. १७ मे २०२२ रोजी मंडळ अधिकारी व तलाठ्यांनी प्रत्यक्ष जायमोक्यावर भेट देऊन पाहणी पंचनामा करुन गेवराई तहसिलला अहवाल दाखल केलेला आहे. उपअधीक्षक भूमी अभिलेख गेवराई यांना तहसिलदारांना गट नंबर ५१० ची हद्दबंदी करुन मोजणी करुन तो अहवाल देखील तहसिल कार्यालयात दाखल करण्याचे आदेशित केलेले होते. हे दोन्ही अहवाल तहसिलला सादर झालेले आहेत, तरीही गेवराईचे तहसिलदार संदीप खोमने हे तलवाड्यातील ....(उर्वरित पान २ वर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com